




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर



**प्रतिनिधी नेमणे आहे.**

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार ७ सप्टेंबर २०२४ | अंक ३०२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# चिमुरडीवर अत्याचार करणारा नराधम शिक्षक अटक

## बदलापूरची पुनरावृत्ती संस्था चालकाला वाचवण्याचा प्रयत्न , माजलगाव शहर आज बंद , मोर्चा

माजलगाव, (प्रतिनिधी): येथील एका शाळेत अल्पवयीन साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी त्याच शाळेतील नराधम शिक्षकास पोलिसांनी अटक केली आहे. राहुल अंबादास वायखिंडे मूळ रा. ब्रह्मगाव ता. कोपरगाव जि. अहील्यानगर असे आरोपीचे नाव असून त्यास ४ दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली आहे. दरम्यान शहरवासीयांच्या वतीने उद्या सोमवारी माजलगाव बंदचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात शाळेत शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलींवर अत्याचाराच्या घटनांची मालिका सुरूच असून बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील एका शाळेतील बालवाडीत साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना २५ ते २८ सप्टेंबर दरम्यान घडली. या घटनेप्रकरणी मुलीच्या पालकांच्या तक्रारीवरून गुरूवारी अज्ञात व्यक्ती विरोधात लैंगिक अत्याचार गुन्हा दाखल करण्यात आला. तर शहरात सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. माजलगाव शहरात एका शाळेत बालवाडी आहे. त्यामध्ये परिसरातील लहान मुले मुली दररोज येतात या परिसरातीलच एक साडेपाच वर्षाची चिमुरडी नियमित शाळेत येते तिला शाळेतील एका अज्ञात इसमाने दि. २५ ते २८ सप्टेंबर रोजी डबा खाल्यानंतर अत्याचार केला. घटनेनंतर चिमुरडी ताप येऊन आजारी पडली त्यामुळे तिला दवाखान्यात उपचार करण्यात आले. घरी आल्यावर तिने शाळेत झालेली ही गोष्ट आपल्या पालकांना सांगितली. पांढरे कपडे घातलेला माणसाला मी ओळखते असेही सांगितले. या घटनेनंतर चिमूरडीच्या पालकांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुरूवारी तक्रार दिली त्यानुसार अज्ञात व्यक्ती विरुद्ध लैंगिक अत्याचार पोस्को गून्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेनंतर



पोलिसांनी सदरील अल्पवयीन मुलीची अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली तर या घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय अधिकारी धीरजकुमार बच्चू व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचे सह पोलीस उपनिरीक्षक सुनील दिंडे यांनी सदरील शाळेची चौकशी करून तेथील सीसीटीव्ही ची तपासणी केली तसेच या शाळेतील सर्व शिक्षकांची ओळख परेड घेतली तसेच शिक्षकांच्या फोटो मधून सदरील चिमुरडीने आरोपी शिक्षकाचा फोटो पाहून त्याची ओळख पटवली त्यानंतर पोलिसांनी संबंधित शिक्षक राहुल अंबादास वायखिंडे सध्या रां. माजलगाव मूळ रा. ब्रह्मगाव ता. कोपरगाव जि. (अहमदनगर) अहील्यानगर यास अटक केली आहे. दरम्यान या आरोपीस न्यायालयासमोर उभे केले असता न्यायदंडाधिकारी धर्माधिकारी यांनी चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### आज सोमवारी माजलगाव बंदचे आव्हान

चिमुरडीवर अत्याचार प्रकरणाचे आता तीव्र प्रतिसाद उमटत असून या घटनेप्रकरणी शहरवासी यांच्या वतीने संबंधित घटनेतील संपूर्ण आरोपींना व संस्था चालकांना कडक शासन करण्यात यावे यासाठी माजलगाव शहरवासीयांतर्फे उद्या दि.७ सोमवारी माजलगाव शहर बंद व मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून हनुमान चौक भागातून हा मोर्चा शहर पोलीस स्टेशन ते तहसील कार्यालयावर नेण्यात येणार असल्याचे निवेदन पोलीस ठाण्यात देण्यात आले. या निवेदनावर सुरेंद्र रेदासनी, कल्याण आबुज, रत्नाकर कुलथे, विलास नेमाने, रामराव दहिवाळ, गजानन बोकन, राजेंद्र टाक, वैजनाथ दहिवाळ, शशिकांत डहाळे, गणेश शहाणे, अजय दहिवाळ, अक्षय आंबिलवादे, लक्ष्मीकांत राम करण कुलथे, अनिकेत आंबीलवादे, मोहित दळवी, रामेश्वर कुलथे, विजयप्रकाश कुलथे, विकास उदावंत, राजू उदावंत, नारायण सातपुते आदींसह अनेकांच्या स्वाक्षरी आहेत.

## जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत प्रियल कराड व अमृता पुडालेचे यश.

### (खोलेश्वलरच्या विद्यार्थीनी विभागीय स्पर्धेत करणार जिल्ह्याचे नेतृत्व..)

दैनिक लोकआरंभ//

अंबाजोगाई (प्रतिनिधी) :- दि. ०५/१०/२०२४ रोजी बीड येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत १७ वर्ष वयोगटात खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या प्रियल कराड १०० मीटर धावणे प्रथम,अमृता पुडाले हातोडा फेक द्वितीय



क्रमांक पटकावला असून या दोघींचीही संभाजीनगर येथे होणा-या विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेकांना विद्यालयातील क्रीडा शिक्षक सतीश बलुतकर,कल्पना जवळगांवकर यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,शहरातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजयराव वालवडकर,स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह किरण कोदरकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ अतुल देशपांडे, मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे, शालेय समितीचे सर्व सदस्य, उपमुख्याध्यापक माधव जोशी, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## मराठा आरक्षणासाठी तरुणांनी केली आत्महत्या

मराठा आरक्षणाच मुद्दा गेल्या वर्षभरापासून ऐरणीवर असताना मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण होवूनही सरकार मराठा समाजाला आरक्षण देत नाही. राज्य सरकार समाजाला फसवत आहे. आरक्षण नसल्याने नोकरी लागेना. या नैराश्यातून एका तरुणाने टोकाचे पाऊल उचलत खिशामध्ये चिठ्ठी लिहून ठेवत जिल्हा परिषदेच्या चाचाहत आलेल्या झाडाला गळसा घेवून आत्महत्या केल्याची घटना सकाळी उघडकीस आल्याने एकच सबळ उदाली आहे. बीड शहराजवकील नायगाव येथील अर्जुन कवठेकर या तरुणाने जिल्हा परिषदेच्या आतल्या एका झाडाला गळफास घेता सरकार मराठा समाजाला आरक्षण देत नाही दिलेला देलेला शब्द पाळत नाही. त्यामुळे मराठा बांधवांनी एकजुट व्हाये असे लिहिले आहे. सापडलेली चिठ्ठी पोलिसानी जप्त केली आहे: अर्जुन कवठेकर है आजगी बस चालक होते. या प्रकरणाचा पोलीस आता तपास करत आहेत, कराडेकरा?? आत्महत्येने बीड शहरामध्ये एकच खळखळ उडाली आ

## ८ ऑक्टोबर रोजी बीडमध्ये खा. डॉ श्रीकांत शिंदे यांचा विधानसभा संवाद दौरा मेळावा

### शिवसैनिकांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे- जगताप, मुळूक




बीड, प्रतिनिधी- विधानसभा सभा निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या असताना आचार संहिता लागू होण्या अगोदर शिवसेना नेते संसदरत्न खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांचा येत्या मंगळवारी दि. 8 ऑक्टोबर रोजी दुपारी 12.00 वाजता शहरातील आशीर्वाद मंगल कार्यलय बार्शी रोड येथे बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी दिली आहे. यासंदर्भात दोन दिवसांपूर्वीच शिवसेना उप नेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मेळाव्याच्या पूर्व तयारी साठीची बैठक देखील पार पडली. या बैठकीमध्ये अर्जुनजी खोतकर साहेब यांनी खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब बीड मतदार संघात पहिल्यांदा येत असून त्यांच्या विधानसभा संवाद दौरा मेळाव्या बाबत महत्वपूर्ण सूचना मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या सूचनेनुसार बीड शिवसेना महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनेचे आजी- माजी पदाधिकारी- लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या उत्साहाने कामाला लागले असून डॉ श्रीकांत शिंदे यांचा विधानसभा संवाद दौरा मेळावा अत्यंत शिस्तीत आणि नियोजनबद्ध पार पडेल असे बीड शिवसेनेच्या वतीने सांगण्यात आले असून बीड जिल्ह्यातील सर्व शिवसैनिकांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांच्या वतीने करण्यात आले आहे. ○○○○○

## गोंडवाना विद्यापीठ जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन समितीवर गंगाधर बनबरे यांची नियुक्ती

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्र अध्यासन समितीवर ख्यातनाम वक्ते इतिहासाचे गाढे अभ्यासक संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते मा.गंगाधर बनबरे यांची समितीवर निवड करण्यात आली आहे. गोंडवाना विद्यापीठाकडून जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आलेला असून विद्यापीठात सदर अध्यासन केंद्र लवकरच सुरू करण्याचे आहे. त्याकरिता जगद्गुरु संत तुकाराम



महाराज केंद्र अध्यासन समिती गठीत करण्यात आलेली असून त्यामध्ये आपले नामनिर्देशन करण्यात आले असल्याचे पत्र गंगाधर बनबरे यांना विद्यापीठाकडून प्राप्त झाले आहे. गोंडवाना विद्यापीठाच्या संत तुकाराम महाराज अध्यासन समितीवर निवड झाल्याबद्दल मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड.पुरुषोत्तम खेडेकर माजी.आमदार रेखाताई खेडेकर संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड.मनोज आखरे महासचिव सौरभ खेडेकर यांच्यासह अनेकांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

## अनिलदादांच्या होम मिनिस्टर स्पर्धेत हजारो महिला-भगिनींना मिळाले मनोरंजनाचे जम्बो पॅकेज!

### अनिलदादा यंदा आमदार व्हा; उपस्थित महिला भगिनींची आर्तहाक नारीशक्तीचा सन्मान हेच बाळासाहेबांचे संस्कार- अनिलदादा जगताप

बीड, प्रतिनिधी- तीनशे पासष्ट दिवस चोवीस तास आपल्या कौटुंबिक जबाबदारीवर तत्पर असणाऱ्या महिला भागीनींना एक विरुंगुळा मिळावा या उदात्त हेतूने शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल मामा जाधव यांनी काल दि. 5 ऑक्टोबर रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा आगळा-वेगळा कार्यक्रम वजा स्पर्धा घेतली. या स्पर्धेमध्ये बीड शहर-ग्रामीण भागातील हजारोच्या संख्येने महिला-भगिनी मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. अत्यंत देखण्या आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमात महिला भगिनीं आमच्या दादांचा कार्यक्रमा म्हणजे नो प्रॉब्लेम असं म्हणत धमाल उडवली. गप्पा-गोष्टी, गाणी- उखानी, खेळ, मौज-मज्जा आणि भरपूर मनोरंजन करत लाडक्या बहिणींनी मनमुराद आनंद लुटाला. यादरम्यान हजारोंच्या संख्येने उपस्थित असणाऱ्या महिला-भगिनीं अनिलदादा यांची भेट घेऊन अनिलदादा यंदा तुम्ही आमदार व्हा, अशी आर्तहाक देत इच्छा व्यक्त करत होत्या. नारीशक्तीचा सन्मान हा संस्कार हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांनी आम्हा शिवसैनिकांवर बिंबवलेला आहे. याचमुळे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब यांनी माझी लाडकी बहीण, अन्नपूर्णा अशा विविध योजना महिला सबळीकरणासाठी अमलात आणल्या आहेत. आम्ही देखील मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या प्रेरनेतूनच महिला सन्मान व हिताचे कार्यक्रम-उपक्रम राबवत आहोत असे अनिलदादांनी आपल्या मनोगत भाषणात महिला-भगिनींसमोर भावना व्यक्त केल्या व आगामी काळात आपण मोठ्या स्वरूपात महिला भगिनींसाठी अशा आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमाचे वारंवार बीड शिवसेनेच्या वतीने आयोजन करण्यात करणार असल्याचेही अनिलदादा जगताप यांनी सांगितले. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी मनोगत भाषणात सर्व महिला भगिनींचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या. विजेत्या महिलांना फ्रिज, टीव्ही, शिलाई मशीनसह पैठणी साडी देण्यात आली तर सर्व सहभागी महिलांना आकर्षक भेटावस्तु दिल्या. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असणारे अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील यांनी या कार्यक्रमास विशेष रंगत आणली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले तर ऋषिकेश मोहळे आणि सुमित केंद्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कुणाचीही गैर सोय न होऊ देता अत्यंत नियोजनबद्ध पार पडलेल्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन कार्यक्रमाचे आयोजक अमोल जाधव व त्यांच्या मित्रमंडळाने केले होते. याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी अमोल मामा जाधव मित्रमंडळाचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, ऍडव्ह संगीता चव्हाण, शेषेराव जगताप नगराध्यक्ष वडवणी यांच्यासह शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी- लोकप्रतिनिधी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते तर बीड शहर-ग्रामीण भागातील महिला हजारोंच्या संख्येमध्ये उपस्थित होत्या. ○○○○○

# उगवत्या 'सूरज'चं महाराष्ट्रभरात कौतुक, 'झापुक झूपक' प्रवासाने सुनेत्रा पवारही भारावल्या, म्हणाल्या...





**दैनिक लोकआरंभ//**

बिग बॉस मराठी सीझन पाच जिंकल्यानंतर राज्यभरातून सूरज चव्हाण याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सुनेत्रा पवार यांनी सूरज चव्हाण याचं भरभरुन कौतुक केलं आहे. सुनेत्रा पवार यांनी फेसबुकवर पोस्ट टाकत सूरज चव्हाण याचं कौतुक केलं आहे. "बारामतीचा सूरजने बिग बॉस जिंकले! आपल्या बारामती तालुक्यातील मोढवे गावच्या सुपुत्राने बिग बॉस शोचे विजेतेपद पटकावले. त्याचे कौतुक करायला शब्द अपुरे पडतायत. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आलेला सूरज स्वत:च्या कलागुणांच्या बळावर आज जगभरात जिथे जिथे मराठी लोक आहेत तिथपर्यंत प्रसिद्धी पावला आहे. समस्त मराठी मनांचा लाडका झाला आहे", असं सुनेत्रा पवार म्हणाल्या."सूरजने पहिल्या दिवसापासून बिग बॉस शोमध्ये सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तेव्हाच खात्री पटली होती की, हे लेकरू बाजी मारणार. ती खात्री आज प्रत्यक्षात साकारली आहे. सूरजला पाठिंबा देण्यासाठी आम्ही आवाहन केले होते. त्याला भरभरून प्रतिसाद मिळाला. अवघ्या काही दिवसांपूर्वी त्याच्या मोढवे गावी जाऊन तो विजयी होईल असा विश्वास व्यक्त केला होता. त्याला शुभेच्छा दिल्या होत्या. त्याचे सार्थक झाले. या उत्तुंग यशाबद्दल सूरजचे खूप खूप अभिनंदन", असं म्हणत सुनेत्रा पवार यांनी सुरजचं कौतुक केलं आहे.

सूरज चव्हाण हा मूळचा बारामतीचा आहे. तो बारामतीमधील मोडवे गाव येथे वास्तव्यास आहे. सूरज चव्हाण हा आता लोकप्रिय आणि प्रसिद्धीच्या झोतात आला असला तरी त्याचं वैयक्तिक आयुष्य खूप खडतर राहिलं आहे. सूरजचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला होता. तो लहान असतानाच त्याच्या आई-वडिलांचं निधन झालं होतं. त्याची घरातील परिस्थिती बेताची असल्यामुळे त्याला इयत्ता आठवी पर्यंतच शिक्षण घेता आलं होतं. सूरजला पाच बहिणी आहेत. यांपैकी मोठ्या बहिणीने सूरजचा सांभाळ केला.सूरज मोलमजुरी करायचा. या दरम्यान त्याला टिकटॉक बद्दल समजलं. त्याने सुरुवातीला एक-दोन व्हिडीओ टाकून पाहिले. ते व्हिडीओ व्हायरल झाले. यानंतर सूरजने मेहनत करुन स्वत:च्या हिंमतीवर मोबाईल खरेदी केला. त्यामोबाईलमध्ये त्याने टिकटॉक डाऊनलोड केलं आणि तो व्हिडीओ शेअर करु लागला. त्याच्या व्हिडीओला चांगली प्रसिद्धी मिळाली. त्याचे व्हिडीओ खूप व्हायरल झाले. यामुळे त्याला काही यूट्यूब चॅनलकडून शॉर्ट फिल्मसाठी ऑफर येऊ लागल्या. टिकटॉक बंद झाल्यानंतर सूरजने यूट्यूब चॅनल सुरु केलं. तिथे देखील त्याला लाखो चाहत्यांनी प्रतिसाद दिला. त्यामुळे सूरज आज बिग बॉसच्या घरापर्यंत पोहोचू शकला.

# बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार; अनिलदादा मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे अत्यंत विश्वासू- अर्जुनराव खोतकर

## शिवसेनेची बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा पूर्व नियोजन बैठक संपन्न!

**दैनिक लोकआरंभ//**

बीड, प्रतिनिधी- शिवसेना नेते संसदरत्न खासदार मां. डॉ श्रीकांत शिंदे साहेबांचा बीड विधानसभा संवाद दौरा विजयाकडे घेऊन जाणारा ठरला पाहिजे. बीड मतदार संघ शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला आहे आणि सध्या सर्वात जास्त अनुकूल परिस्थिती आहे त्यामुळे बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार यात शंका नाही. जिल्हाप्रमुखामध्ये अनिलदादा जगताप मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या अत्यंत जवळचे आणि विश्वासू आहेत. दादांच्या कार्य पद्धतीवर शिंदे साहेबांचा विश्वास आहे. दादांना शिंदे साहेबांकडे विशेष आदर सन्मान आहे. आपल्याकडे दोन माहीने राहिलेत. येणारे दोन माहीने पक्षाला द्या. रात्रीचा दिवस दिवसाची रात्र करा. बीड मतदार संघावर आपली चांगली पकड आहे, आपण बाळासाहेबांचे शिवसैनिक आहोत त्यामुळे येणारी निवडणुका आपल्याला मोठ्या ताकदीने लढावी लागणार आहे असे प्रतिपादन शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांनी केले.



संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांचा येत्या 8 ऑक्टोबर रोजी बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा संपन्न होणार आहे. याच अनुषंगाने काल दि. 5 ऑक्टोबर 2024 रोजी दु. 3.00 वाजता दरम्यान बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मेळाव्याच्या पूर्व तयारीसाठी बैठक पडली. या बैठकीमध्ये अर्जुनजी खोतकर साहेब यांनी खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब बीड मतदार संघात पहिल्यांदा येत असून त्यांच्या संवाद दौरा मेळाव्या बाबत महत्वपूर्ण सूचना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, येणारा काळ शिवसेनेचा आणि शिवसैनिकांच्या भगव्याचा असून महाराष्ट्रावर भगवा फडकविण्यासाठी एकजूट होऊन ताकदीने विधानसभा निवडणूक लढवायची असल्याचे सांगितले. बीडची जागा ही शिवसेनेची आहे व ती शिवसेनेलाच सुटेल यात शंका नाही असे त्यांनी सांगितले. यादरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी देखील उपस्थितांना संबोधित केले व दोघांनी मिळून बीड मतदार संघात शिवसैनिक पदाधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणी समस्या अर्जुनराव खोतकर यांच्यासमोर मांडल्या. या बैठकीसाठी बीड जिल्हा शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनेचे आजी- माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मी घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे- अनिलदादा जगताप

खूप दिवसांपासून अन्याय सहन करतोय. प्रत्येकवेळी मला थांबवण्यात आले व माझा पाय ओढण्यात आला. मात्र आता मी आता घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे. बीड मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. कार्यकर्त्याला मोठं करण्यची, त्यांना ताकद देण्याची दानत मुख्यमंत्री शिंदे साहेबांमध्ये आहे व शिंदे साहेबांचा आशीर्वाद, विश्वास आणि पाठबळ माझ्यासोबत आहे म्हणून मला यावेळी कसलीच चिंता राहिली नाही. शिवसैनिकांनो, अफवांवर विश्वास ठेऊ नका बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे. त्यामुळे कामाला लागा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड विधानसभा संवाद दौरा पूर्व नियोजन बैठकीत आपल्या शिवसैनिक पदाधिकाऱ्यांना केले.



# धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर खड्डा नव्हे तर भगदाड, अपघाताला निमंत्रण ; तात्काळ दुरुस्तीची मागणी:- डॉ.गणेश ढवळे

बीड :- (दि.०६) बीड तालुक्यातुन जाणा-या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ धुळे ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर मांजरसुंभा येथील हॉटेल कन्नैय्या पासुन २०० मीटर अंतरावर बीडकडे जाणा-या उड्डाणपूल संपतो त्याठिकाणी रस्त्यावर खड्डा नव्हे तर मोठं मोठाली ३ भगदाडे पडली असून रात्री अपरात्री भगदाड लक्षात न आल्याने मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नसुन संभाव्य धोका टाळण्यासाठी तातडीने दुरुस्ती करून खड्डा बुजविण्यात यावा अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड, यांच्या मार्फत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी, महाव्यवस्थापक तथा प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद



अरविंद काळे यांना केली आहे. राष्ट्रीय महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढलेले असुन शासकीय नोंदीनुसार जानेवारी ते एप्रिल २०२३ दरम्यान १२० दिवसात १२९ अपघात आणि १३९ जणांचा मृत्यू झाला आहे.शिवाय ९८ अपघातात १३० जण गंभीर जखमी झाल्याची नोंद आहे. अतिवेग बरोबरच रस्त्याची दुरवस्था अपघाताचे कारण अपघात होण्यास अतिवेग हे जरी मोठ्या प्रमाणात कारण असले तसेच वाहनधारकांचा निष्काळजीपणा, ओव्हरटेक करणे,चुकीच्या दिशेने प्रवेश अथवा वाहन चालवणे पण त्याच बरोबर निकृष्ट दर्जाचे रस्ते जागोजागी रखडलेले अपुर्ण रस्ते व खड्डे पडणे हे सुद्धा अपघाताचे प्रमुख कारण आहे. रस्ता सुरक्षा अभियान कागदावरच केवळ फोटोसेशन - - - प्रशासनाकडून राबविण्यात येणारे "रस्ता सुरक्षा अभियान"कागदावरच असुन रापम, पोलिस प्रशासन, आणि आरटीओ विभाग लाखों रुपये खर्च करून जनजागृतीच्या नावाखाली केवळ फोटोसेशन करताना दिसुन येते.याचा फारसा फायदा दिसून येत नसल्याने अपघात रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविणे गरजेचे आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी.



अंबाजोगाई- (प्रतिनिधी) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५५ वी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची १२० वी जयंती येथील श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,तर प्रमुख पाहुणे म्हणून दत्ता सावंत यांची उपस्थिती होती.दत्ता सावंत यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.अध्यक्षीय समारोप पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे यांनी केला.कार्यक्रमानंतर एनसीसी विभागाच्या वतीने कॅप्टन शैलेश कंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.यात एनसीसीचे सर्व कॅडेट,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आनंदाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे नियोजनमुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे,उपमुख्याध्यापक माधव जोशी,यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालय प्रमुख संजय राडीकर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निलेश माजलगांवकर,प्रास्ताविक रा.अ. कुलकर्णी,आभार दाभाडे ताई यांनी तर कल्याणमंत्र किशोरी कुलकर्णी यांनी घेतला.कार्यक्रमाचे नियोजन सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले होते.

# मराठा सेवा संघ नांदेड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघ नांदेड उत्तर दक्षिण जिल्हा कार्यकारिणी बैठक प्रदेश सहसचिव डॉ.पंजाबराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण मराठा मुलांचे वसतिगृह नवा मोढा नांदेड येथे पार पडली.जिल्हा कार्यकारिणी गठीत करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.प्रारंभी राष्ट्रमाता माँ.साहेब जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण जिजाऊ वंदनेने बैठकीला सुरुवात करण्यात आली. जिल्हा कार्यकारिणीत दक्षिणच्या जिल्हा सचिव पदी रमेश पवार जिल्हा कार्याध्यक्षपदी बळीराम फाजगे रवि ढगे,सहसचिव गोविंदराव वर्ताळे,जिल्हा उपाध्यक्ष हौसाजी गाढे, सुभाषराव



पानपट्टे,वि.रा.शिंदे,संतोष लोंढे, डॉ प्रभाकर जाधव, इजि संजय लोंढे, शंकर जाधव, जेष्ठ सल्लागार म्हणून शिवाजी पाटील, प्रल्हाद कऱ्हाळे, अशोक खुडे,विनायकराव कदम यांची निवड तर नांदेड उत्तर सचिव पदी प्रा.भास्कर थेटे,कार्याध्यक्ष डॉ राधाकृष्ण होगे सहसचिव डॉ.वसंतराव कदम, संघटक डॉ.दत्ताजी कदम, उपाध्यक्ष विनायक चव्हाण, माधव तिडके, डॉ विलास शिंदे यांची तर नांदेड महानगराध्यक्ष पदी डॉ.प्रशात तावडे यांची निवड करण्यात आली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इंजि.प्रविण जाधव यांनी केले. यावेळी विभागीय अध्यक्ष इंजि. शे.रा.पाटील, इंजि तानाजी हुस्सेकर, नानाराव कल्याणकर, उध्दवराव सुर्यवंशी,शिवानंद पाटील मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम ॲड.सतिशकुमार जाधव, संभाजी ब्रिगेडचे हदगाव तालुकाध्यक्ष किरण वानखेडे आदींसह मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेडचे आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

# पांढऱ्या सोन्याला झळाळी कधी मिळणार ?जागतिक कापूस दिन विशेष.

आज जागतिक कापूस दिन जगभरात भारतासह उष्ण हवामान असणाऱ्या अनेक देशांमध्ये कापसाचे उत्पादन घेतले जाते. त्यात प्रामुख्याने चीन, अमेरिका, ब्राझील, पाकिस्तान, उझबेकीस्तान, तुर्की, ऑस्ट्रेलिया, अर्जेन्टिना, माली या देशांचा समावेश होतो. जगात सर्वाधिक कापसाचे उत्पादन घेणारा देश म्हणुन भारताची ओळख आहे. जगभरात उत्पादित होणाऱ्या एकून कापसापैकी २५ टक्के उत्पादन भारतात घेतले जाते. भारत कापड आणि टेक्षटाईलचा जगातील दुसरा सर्वात मोठा निर्यातदार देखील आहे. यासोबतच भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा कापसाचा ग्राहक असून २०२२-२३ मध्ये एकून ३३८ लाख गाठी वापरण्यात आल्या. ५ कोटी ९ लाख टन कापसाचे विक्रमी उत्पादन सन २०२२-२३ घेण्यात आले. भारतातील सुमारे ६७% कापूस पावसावर अवलंबून आहे तर उर्वरित ३३% उत्पादन बागायती पद्धतीने घेतले जाते. भारतात कापूस पहिल्यांदा सिंधू संस्कृतीत सुमारे ७००० वर्षांपूर्वी उगवला गेला. भारतात प्रामुख्याने G.arboreum आणि Herbaceous (आशियाई कापूस), G.barbadense (इजिप्शियन कापूस) आणि G. hirsutum (अमेरिकन अपलँड कापूस) या चार प्रजाती लागवड केल्या जातात. एवढ सगळ असताना खेदाची बाब हि कि उत्पादकतेच्या बाबतीत, भारत सरासरी ५१० किलो/हेक्टर उत्पादन घेत असून जगाच्या स्पर्धेत 38 व्या क्रमांकावर आहे. उत्पादन जास्त असुनही उत्पादकता कमी का आहे. उत्पादकता आणि गुणवत्ता कशी वाढवता येईल यावर लक्ष देणे महत्वाचे आहे. अल्पभूदारक भारतीय शेतकरी त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वयक्तिक पातळीवर वापर अशक्य, बदलते हवामान, जागतिक तापमानवाढ, नवनवीन किडींचा वाढता प्रादुर्भाव हि करणे कापूस आणि इतर पिकांचे उत्पादन कमी होण्यासाठी कारणीभूत आहेत. यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गट शेती, शेतकरी उत्पादक कंपनी आणि शासकीय मदत यांची योग्य सांगड घालत प्रयत्न करणे गरजेचे आहे. गुलाबी बोंड अळी प्रादुर्भाव हि कापसातील प्रमुख समस्या आहे. बीटी तंत्रज्ञान अपग्रेड न केल्याने किंबहुना सन २०१४ पासून त्यावर केंद्र सरकारने बंदी घातल्याने भारतातील कापसाचे उत्पादन घटायला सुरुवात झाली आहे. बीटी ३ सध्या (MHBT) ला मान्यता देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. बीटी ३ लागवड करून होणारे संभाव्य धोके कितपत आहेत याची खात्री करून घेणेहि तितकेच गरजेचे वाटते. सध्या काही शेतकरी चोरट्या मार्गाने बीटी ३ बियाण्याची लागवड करत आहेत. बऱ्याच कंपन्या शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतात आणि बोगस बियाणे विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत. बीटी बियाणे भारतात आल्यानंतर फक्त ५ वर्षांपर्यंत चांगली उत्पादन वाढ झाली त्यानंतर काही काळ उत्पादकता स्थिर झाली. बीटी बियाणे वापरल्यामुळे उत्पादकता वाढली असे आपण १०० टक्के म्हणू शकत नाही. कारण बीटी बियाण्याचा वापर जसा वाढला तसे सिंचनाचा, खतांचा आणि किटकनाशकांचा वापरही वाढला. मागच्या ४-५ वर्षांपासून पुन्हा उत्पादकता कमी झाली आहे कारण खते, कीटकनाशके यांच्या अति वापरामुळे जमिनीचे आरोग्य ढासळले आहे त्यामुळे फक्त सुधारित जनुकीय वानांवरच भर न देता सेंद्रिय, पुनरुत्पादक शेती पद्धतींचा वापर करत शाश्वततेकडे कसे वळता येईल यावर अधिक विचार मंथन व्हायला हवे.



सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून शेतावरच निविष्ठा बनविण्याचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना देता येईल. सेंद्रिय पद्धतीने चांगल उत्पादन घेणारे शेतकरी देखील राज्यभरात आहेत. तर हे सेंद्रिय कापूस लागवडीच तंत्रज्ञान देशातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सेंद्रिय पद्धतीने नक्कीच उत्पादन खर्च कमी होऊन, मातीचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल. भारतातील वस्त्रोद्योग हे दुसरे सर्वात मोठे रोजगार निर्माण करणारे क्षेत्र आहे. म्हणुन कापूस उत्पदान वाढवून त्यातून अधिकाधिक रोजगार संधी उपलब्ध करून, भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे काम होईल. कापसासाठी दरवर्षी हमीभाव जाहीर केला जातो. परंतु हमीभाव अगदीच तटपुंजा असतो. हमीभाव म्हणजे किमान शासन त्या शेतमालाचे बाजारभाव मार्केट मध्ये पडले तरी जाहीर केलेल्या भावाने खरेदी करण्याची हमी देते. परंतु देशात किती हमीभाव केंद्रे आहेत आणि त्याद्वारे किती खरेदी केली जाते हे वेगळे सांगायची गरज नाही. बऱ्याचदा शेतकऱ्यांकडे कापूस साठवणुकीसाठी चांगली जागा उपलब्ध नसते. घरगुती जागेत माल साठवाल्याने गुणवत्ता ढासळली जाण्याची शक्यता अधिक असते. म्हणुन गावोगावी शेतमाल साठवणुकीसाठी गोदामे असणेहि तितकेच गरजेचे आहे. शेतमाल उत्तम प्रतीचा तयार होऊनही साठवणुकीच्या वेळी काळजी न घेतल्याने नुकसान होते. कारण कापसाचा भाव कापसाचा रंग, स्वच्छता, धाग्याची लांबी आणि ताकत यावरून ठरवला जातो. शासकीय पातळीवर खूप चांगल्या योजना जाहीर केल्या जातात मग त्यात सेंद्रिय शेतीसाठी साठी असेल, सिंचनासाठी असेल, शेतमाल साठवणुकीसाठी असेल परंतु त्या योजनांची अंमलबजावणी करताना काटकसरच पाहायला मिळते. त्यामुळे आज जागतिक कापूस दिनाच्या निमित्ताने पांढऱ्या सोन्याचं उत्पादन घेणारा शेतकरी समृद्ध करायचा असेल तर कापसाला योग्य हमीभाव आणि उत्पादनासाठी लागणाऱ्या निविष्ठा अल्प दारात उपलब्द करून देण अधिक गरजेचं आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ७ सप्टेंबर २०२४
https://lokaarambh.com



# उमेदवार कोण ? ते कळू द्या मग सगळी कुंडली बाहेर काढतो : आ.बाळासाहेब आजबे

## दासखेड पाटोद्यातील उद्घाटन प्रसंगी आमदार आजबेंनी त्यांच्या स्टाईल मध्ये दिलं विरोधकांना उत्तर

### कुणी कितीही वाबड्या उडवा जनतेच्या मनात फक्त आमदार आजबे **काकाच!**

पाटोदा | प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील दासखेड येथे हायब्रीड ऑन्यूड्युटी अंतर्गत 206 कोटी 33 लक्ष रुपयांच्या रस्ता कामाचा भव्य उद्घाटन तर पाटोदा येथे प्रशासकीय इमारत बांधकाम 23 कोटी 94 लाख रुपये तसेच महसूल अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकाम 14 कोटी 38 लाख रुपयांची भव्य भूमिपूजन संपन्न झाले यावेळी आमदार आजबे यांनी विरोधकांना चांगलंच फाईलवर घेतलं आणि त्यांच्या स्टाईल मध्ये उत्तरही दिलं उमेदवार जाहीर नाही मग बोलू काय उमेदवार जाहीर होऊ द्या मग त्यांची सर्व कुंडलीच बाहेर काढतो कुणी देवस्थानाच्या जमिनी हडप केल्या कोणी पारड्याच्या माणसांना दादागिरी केली कोणी बोगसगिरी केली हे सर्व काढतो थोडं थांबा असं म्हणत विरोधकांना चांगलच निवडणुकी पूर्वीच फाईलवर घेतलं तर हा तर फक्त पिक्चर चा ट्रेलर दाखवल्याचं दिसून आलं मग पिक्चर कसा असेल लक्षात आलेच असेल त्यामुळे निवडणुकीपूर्वीच आजबेंनी ट्रेलर दाखवत विरोधकांना चांगलीच धडकी भरणारवक्त केले याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार यशवंत माने, जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, काकासाहेब शिंदे, तहसीलदार निलावड साहेब, इंजिनीयर कृष्णा पानसंबळ, विश्वास नागरगोजे, आरोग्य अधिकारी कासट साहेब, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दिपक घुमरे, यांच्यासह डॉ.आठवले, एडवोकेट पांडुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात विकासाची गंगा कशी वाहत आहे आणि कशी वाहणार आहे याच उदाहरण आज दासखेड येथे हायब्रीड ऑन्यूड्युटी अंतर्गत 206 कोटी 33 लक्ष रुपयांच्या रस्ता कामाचा भव्य उद्घाटन तर पाटोदा येथे प्रशासकीय इमारत बांधकाम 23 कोटी 94 लाख रुपये तसेच महसूल अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकाम 14 कोटी 38 लाख रुपयांची भव्य भूमिपूजन करून आमदार बाळासाहेब आजबे यांनी दाखवून दिले आहे. येणाऱ्या काळात मतदार संघाचे सर्वच प्रश्न मीच सोडवणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितलं आणि विरोधकांनी फक्त गप्पा मारल्या त्या व्यतिरिक्त काहीच केलं नाही. जुनेच कागदपत्र दाखवत विरोधक



जनतेला फसवत आहेत हे जनतेला सुद्धा माहिती आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत सर्व दूध का दूध आणि पाणी का पाणी होईलच पण त्या अगोदर उमेदवार जाहीर होऊ द्या मग त्याची कुंडलीत बाहेर काढतो असा जगदम आमदार बाळासाहेब आजबे यांनी उद्घाटन प्रसंगी दिले तर जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी बोलताना सांगितलं की आमदार आजबे हे शेतकरी कुटुंबात असल्याने शेतकऱ्यांविषयी त्यांची तळमळ सिंचन रस्ता यासाठी त्यांचा विशेष प्रयत्न असून सर्व प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी केलेली धावपळ आणि त्याला मिळाले यश हे खूप मोठा आहे. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्ये दीपक दादा घुमरे यांनी सांगितले की प्रशासकीय इमारतीमुळे शहराच्या वैभवात भर पडली असून ना भूतो ना भविष्य असा निधी पाटोदा तालुक्याला उपलब्ध करून दिला त्यामुळे तालुका प्रगतीपथावर आहे येणाऱ्या काळात काकाच्या माध्यमातून असेच विकास काम होतील यातही शंका नाही असे भावना व्यक्त केली या प्रसंगी कार्यक्रमास परमेश्वर येवले,भाऊसाहेब लटपटे,महेश भय्या आजबे, यश भैय्याआजबे बप्पासाहेब जाधव, नगरसेवक बाबुराव जाधव, दादासाहेब घुमरे,नारायण मामा नागरगोजे, अंगद भोंडवे,विठ्ठल जगताप,अशोक बांगर, मंगेश पवार, भाऊसाहेब जाधव, प्रवीण पवळ, सुभाष पोकळे, भाऊसाहेब भरटे,अण्णा शिंदे, संजय घोषिर,रियाज सिद्दीकी, शिवराज जाधव, किशोर जेधे,बाळू तांबे, ऋषिकेश सानप ,बाबुराव सोंडगे, बंडू सावसे ,दादा पवार, युवराज कोकाटे, राजेंद्र सकुंडे, सरपंच संजय कवठेकर, आण्णासाहेब लवांडे पाटील, अविनाश पवार, मधुकर येवले,अरुण येवले,आनंद घुमरे,अनिल दगडखेर, युवक तालुकाध्यक्ष युवराज पाटील झुनगुरे, रामचंद्र माकाळ, भगवान शिंदे, सत्यवान शिंदे आण्णा टेकाळे,अभिजित मुंडे, रामकृष्ण नांदे प्रभाकर कवठेकर, बालाजी कवठेकर,शिवाजी नेमाने, दादा पवार,हनुमंत भोसले,प्रदीप घुमरे, ठाकूर केशव, तात्यासाहेब कोकाटे, अफसर शेख, साहेबराव बेद्रे पाटील, गौतम सरवदे,गोकुळ वाघ, बाप्पा खामकर,नाना कवठेकर,अरुण गिलबिले, विठ्ठल चौरे, बाळू खाडे ,तुषर भोसले,राजेंद्र खाडे, रवींद्र गिरे,मेहराज आतार , कुमटकर सर, दादा साहेब वीर, बाबू काशीद, सुधाकर जायभाय आदी सह हजारोच्या संख्येने उपस्थिती होती.

### आ.आजबे यांच्या कामावर जनता खुश कुणी कितीही वाबड्या उडवा

सध्या आमदार आजबे यांचं काम दमदार आणि जोरदार असल्याने विरोधक अनेकांना हाताशी धरून बदनामीच्या वाबड्या उडवत आहेत पण कुणी कितीही बावड्या उडवा जनतेला माहिती आहे की कामाचं कोण आणि बिनकामाचे कोण त्यामुळे कुणी कितीही वावड्या उडवा जनता मात्र आमदार आजबे यांच्या कामावर जनता खुश असल्याचा सुद्धा बोलले जात आहे.

## एकविरा माता व तुळजाभवानी माता देवीची आरती हरिदास चोपडे तसेच अनंता करंडे सपत्नीक यांच्या हस्ते आरती संपन्न..



सोलापूर ।विश्वास चोपडे कव्हे ता माढा येथे जय तुळजाभवानी मंडळ व एकविरा माता मंडळ अशी दोन्ही देवीची स्थापना केली जाते. दिनांक ०६/१०/२०२४ रोजी सायंकाळी ८:०० वाजता एकविरा माता मंडळ येथे हरिदास रंगनाथ चोपडे यांना सपत्नीक आरतीचा मान मिळाला तशेच जय भवानी माता मंडळ येथे अनंता जोतीराम करंडे यांना सपत्नीक आरतीचा लाभ मिळाला.

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये अनेक सण उत्सव मोठ्या उत्साहात आनंदात साजरा केला जातात त्यापैकी नवरात्र हा देवीचा उत्सव कव्हे या ठिकाणी मोठ्या उत्साह साजरा केला जातो. आरतीच्या वेळी अनेक पुरुष व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## सुधाकर ढवळे यांचे निधन



बीड(प्रतिनिधी) येथील बलभीम कॉलेजचे सेवानिवृत्त उपप्राचार्य सुधाकर सखाराम ढवळे यांचे शनिवारी (दि.5) रात्री ११.56 वाजता निधन झाले. ते 61 वर्षांचे होते. सुधाकर ढवळे यांनी 1991 मध्ये बलभीम महाविद्यालयात रुजू झाले. त्यांच्या कार्यकाळात अनेक गुणवंत विद्यार्थी घडले. 2021 मध्ये उपप्राचार्य म्हणून ते सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पार्थिवावर रविवारी (दि.6) मुर्ती (ता.घनसावंगी, जि.जालना) येथे अंत्यविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक सुन, तीन भाऊ,एक बहिण असा परिवार आहे.

## महाविद्यालयीन विद्यार्थी सुरज गुंडला ॲट्रॉसिटी व बलात्कार प्रकरणात १४ दिवसात जामीन मंजुर



केज । प्रतिनिधी बीड जिल्ह्यात गाजलेल्या बलात्कार आणि ॲट्रॉसिटी ॲक्ट प्रकरणातून महाविद्यालयीन विद्यार्थी सुरज दिलीप गुंड याला १४ दिवसात जामीन मंजूर सदर प्रकरणाची सुनावणी केडी जाधव यांच्या कोर्टासमोर झाली होती सदर कोर्टाने आरोपीस पन्नास हजार रुपयांच्या जामिनावर मुक्त करण्याचा आदेश पारित केलेला आहे आरोपीतर्फे एडवोकेट रंजीत खोडसे एडवोकेट पी डी इतापे यांनी काम पाहिले..... सविस्तर प्रकरण केज पोलीस स्टेशन येथे दिनांक ११/९/२४ रोजी आरोपीचे विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ६४(१),६४(२)(एम),३३२(ब),११५(२),३५२,३५१(१),३५१(२) भारतीय न्याय संहिता३(२)(५),३(२)(va),३(१)(आर ),३(१)(एस) अनुसूचित जाती आणि आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम,६६,६६(इ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये आरोपी सुरज दिलीप गुंड याचे विरोधात पोलीस स्टेशन केज येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ४८५/२४ प्रमाणे नोंद करण्यात आला होता सदर प्रकरणातील आरोपी हा गेली १४ दिवसापासून न्यायालयीन कस्टडीमध्ये बंद होता सदर प्रकरण हे संबंध जिल्ह्यात एक चर्चेचा विषय ठरले होते संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष जामीन निकालावर लागून होते. सदर प्रकरणात आरोपीतर्फे विधीज्ञ आर व्ही खोडसे विधीज्ञ पी डी इतापे यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले

## भारतीय सेनादलाच्या इको बटालियनकडून कब्रस्तानमध्ये वृक्षारोपण.

किल्ले धारूर । प्रतिनिधी भारतीय सेना दलाच्या पर्यावरणवादी १३६ इको बटालियनच्या बी कंपनी व एतेहाद एकता ग्रुपच्या वतीने दि.६ रविवार रोजी धारूर शहरातील गुलाबशाह कब्रस्तान परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

भारतीय सैन्य दलाच्या पर्यावरणवादी १३६ को बटालियन बी कंपनी धारूर तालुक्यातील विविध शासकीय व सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करत आहे. दि.६



रविवारी शहरातील गुलाबशाह कब्रस्तानमध्ये एतेहाद (एकता) ग्रुपच्या मदतीने वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सैन्य दलाच्या कार्याचे कौतूक करत एतेहाद ग्रुपकडून सैन्य अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार सय्यद शाकेर यांनी इको बटालियनच्या कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी ले.कर्नल अमित प्रभु यांच्या मार्गदर्शनाखाली सुभेदार नाईक दिवेकर , हवालदार शेख जलील, संदीप ठोसळ, हवालदार दादा मंडल, सैनिक जाधव, संतोष काशिद, निवृत्त सुभेदार हाजी सय्यद इस्माईल, ज्येष्ठ पत्रकार सय्यद शाकेर, अफसर तांबोळी, सय्यद पाशा, आमेर तांबोळी, डिस्कव्हरीचे संचालक सय्यद अखिल यांच्यासह एतेहाद ग्रुपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## EVM VVPAT जनजागृतीने मतदार झाला जागृत

बीड । प्रतिनिधी मा.आयोगाने राज्यभरामध्ये ईव्हिएम व व्हिव्हीपॅटचे प्रात्यक्षिक व प्रचार कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे व त्याबाबत सुचना दिलेल्या आहेत . सदर सुचनेच्या अनुषंगाने व जिल्हाधिकारी अविनाश पाठक व उपविभागीय अधिकारी बीड यांच्या मार्गदर्शनाखाली बीड मतदारसंघात ईव्हिएम व व्हिव्हीपॅटचे प्रात्यक्षिक दाखविणे , प्रचार व जनजागृती राबविण्यात येत आहे.

याप्रसंगी महसूल विभागाचे तलाठी व पी बी एरंडे , मास्टर ट्रेनर व त्यांचे सहकारी यांनी गावोगावी जाऊन यांनी प्रात्यक्षिक दाखवले . यावेळी अनेक नागरिक यांनी ईव्हीएम मशीन कशी असते व मतदान कसे करावयाचे याबाबत प्रशिक्षण घेतले.

स्वीप कार्यक्रमच्या अनुषंगाने मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन : विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने मतदारांमध्ये जनजागृती होण्यासाठी बीड विधानसभा मतदार संघाकरिता स्वीप नोडल अधिकारी म्हणुन गट शिक्षणाधिकारी एस एच खान , पंचायत समिती बीड यांची नियुक्ती करण्यात आली आहे . मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून ठिकठिकाणी जनजागृती करुन मतदान टक्केवारी वाढण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत . त्याचाच एक भाग म्हणून दि 04.10.2024 रोजी छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल या ठिकाणाहून निघाली ती बलभीम चौक माळीवेस सुभाष रोड अण्णाभाऊ साठे मार्गे समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल मध्येच करण्यात आला. यामध्ये सुमारे 900 विद्यार्थी सायकल रॅलीमध्ये सहभागी होते. सदर रॅलीस मा.श्री ओंकार देशमुख जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जिल्हा SVEEP नोडल अधिकारी व भगवान फुलारी शिक्षण अधिकारी प्राथमिक यांनी हिरवा झेंडा दाखवला.

## छत्रपती शिवरायांची प्रतिमा स्वीकारताना राहुल गांधींनी केलं असं काही



आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकीय घडामोडी वेगात सुरु आहेत. देशातील अनेक वरिष्ठ नेत्यांकडून सातत्याने महाराष्ट्राचे दौरे सुरु आहेत. त्यातच आज काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांचा कोल्हापूर दौरा पार पडला. यावेळी त्यांनी कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केली. या सोहळ्याला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, कोल्हापूरचे खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, विधान परिषद सदस्य सतेज पाटील यांच्यासह प्रदेश काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी हजेरी लावली. यावेळी राहुल गांधी यांच्या एका कृतीने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. कोल्हापुरातील कसबा बावडा या ठिकाणी असलेल्या भगवा चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे. आमदार सतेज पाटील यांच्या संकल्पनेतून हा बहुशस्त्रधारी भव्य पुतळा साकारला आहे. या पुतळ्याचे अनावरण काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले. या अनावरण सोहळ्यानंतर त्यांना या पुतळ्याची एक छोटी प्रतिमा भेट म्हणून देण्यात आली. ही प्रतिमा स्वीकारताना राहुल गांधींनी भर सभेदरम्यान त्यांच्या पायातील बूट बाजूला काढून ठेवले. याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रतिक्रिया दिली.

## श्री क्षेत्र श्रृंगऋषीगड गडावर होणार सामाजिक भव्य दसरा मेळावा,

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी बीड जिल्ह्यामध्ये दसरा मेळावा खूप मोठ्या प्रमाणात होत आहेत, एकीकडे नारायणगडावर, व दुसरीकडे सावरगाव घाट भगवानगड, व आता तिसरीकडे शिरूर कासार तालुक्यातील श्री क्षेत्र श्रृंगऋषीगड वर दसरा मेळावा होणार असल्याची माहिती गडाचे महंत ह ,भ, प सुरेशानंद महाराज शास्त्री यांनी दिली आहे, हा दसरा मेळावा सामाजिक पद्धतीने होणार



आहे, आशीर्वाद गुरुदेव तुकाराम बाबा रुपनर व गुरुवर्य निगमानंद महाराज यांच्या आशीर्वादाने हा दसरा मेळावा होत आहे, हा दसरा मेळावा या दसरा मेळाव्याची गावागावात तालुक्यात चर्चा होत आहे, हा गड म्हणजे सर्वांना सोबत घेऊन सर्व जातीपातीतले व्यक्ती या गडावर दर्शनासाठी येत असतात, त्यामुळे बीड जिल्ह्यातून खूप जण म्हणत आहेत की यावर्षी पहिल्यांदा गडावर दसरा मेळवा झाला पाहिजे, खूप जन या दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी कामाला लागले आहेत, दि 12.शानीवार या दिवशी दुपारी3. वाजता दसरा मेळावा होणार आहे. या दसरा मेळाव्याला बीड जिल्ह्यातील सामाजिक सर्व राजकीय पक्षातील व्यक्तीने शैक्षणिक पत्रकरिता



क्षेत्रातील, शेतकरी महिला नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचा आव्हान आव्हान गडाचे महंत सुरेशानंद महाराज शास्त्री यांनी केले आहे,

## बीड विधानसभेची जागा मनसे लढवणार; राज ठाकरे यांनी दिले संकेत!

बीड । प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक ५ ऑक्टोबर रोजी मराठवाडा स्तरीय पदाधिकारी आढावा बैठकीसाठी राज ठाकरे आले असता मराठवाड्यातील सर्व विधानसभा मतदारसंघाचा यावेळी त्यांनी पदाधिकाऱ्याकडून आढावा घेतला. बीड विधानसभा मतदारसंघाची जागा महाराष्ट्र निर्माण सेना लढवणार असल्याचे संकेत राज ठाकरे यांनी यावेळी दिले. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना महायुती सोबत युती करणार की स्वातंत्र्य निवडणूक लढवणार या संदर्भात अनेक वेळा राज्यातील पदाधिकाऱ्यासोबत चर्चा करण्यात आली. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र निर्माण सेना स्वातंत्रपणे लढा देणार असल्याचे राज ठाकरे यांनी यापूर्वीच म्हटले होते. या संदर्भात छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा स्तरीय पदाधिकाऱ्यांची बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांची मुलाखती व मतदार संघाचा पूर्ण आढावा मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याकडून घेण्यात आला. यावेळी बीड विधानसभा मतदारसंघाची जागा महाराष्ट्र निर्माण सेना पूर्ण ताकदीने लढणार असल्याचे संकेत मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याकडून मिळाले आहे.

* वर्षाताई जगदाळे यांचे नाव आघाडीवर छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मराठवाडा स्तरीय विधानसभा निवडणुकांच्या आढावा बैठकीत बीड विधानसभा मतदारसंघाची जागा निश्चितपणे मनसे लढणार असल्याचे राज ठाकरे यांच्याकडून संकेत मिळाले आहे.

मागील अनेक वर्षापासून मनसेत निष्ठेने



काम करणाऱ्या मनसेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांची उमेदवारी निश्चित मानली जात. जिल्ह्यातील पदाधिकाऱ्याकडून आढावा बैठकीतही वर्षा जगदाळे यांचे नाव पुढे आले असल्याची चर्चा आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना बीड विधानसभेची जागा लढवणार या जागेसाठी वर्षाताई जगदाळे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा होत आहे.

## अनिलदादांना आमदार करण्यासाठी खा डॉ श्रीकांत शिंदे यांच्या विधानसभा संवाद दौरा मेळाव्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा

### शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे यांचे आवाहन



बीड, प्रतिनिधी- विधानसभा निवडणुकांची लगबग सुरु झाली आहे. येत्या काही दिवसांत आचार संहिता लागू होणार आहे. तत्पूर्वी बीड मतदार संघात शिवसेनेचे युवा नेते संसदरत्न खा.डॉ. श्रीकांत शिंदे विधानसभा संवाद दौरा मेळाव्याकरिता दि. 8 ऑक्टोबर रोजी सकाळी 11.00 वाजता आशीर्वाद मंगल कार्यालय बार्शी रोड बीड येथे येत आहेत. यासंदर्भात शिवसेनेचे उप नेते व मराठवाडा संपर्क नेते अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पूर्व नियोजन बैठक पार आहे. खोतकर साहेब यांनी महत्वपूर्ण सूचना मार्गदर्शन केले आहे व त्या अनुषंगाने शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी-लोकप्रतिनिधी कामाला लागले आहेत. शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिल दादा जगताप यांना आमदार करण्यासाठी संसदरत्न खा.डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या बीड विधानसभा संवाद दौरा मेळाव्यात हजारोंच्या संख्येमध्ये उपस्थित रहा. असे आवाहन शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे यांनी केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
सोमवार ७ सप्टेंबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4



# आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासाठी शरद पवारांचा पुढाकार, जरांगे पाटील म्हणाले स्वार्थासाठी?

**आमच्या भावना, दुःख समजून घ्या. गोरगरिबांचे म्हणणे समजून घ्या. उगाचच तुमचा गाडा रेटू नका. तुमच्या मनासारखे शब्द वापरू नका. तुमच्या मनासारखे तुम्ही वागणे बंद करा, लोकांचे म्हणणे आणि भावना जाणून घ्याङ्क, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.**

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध जाती-जमातीतील लोक आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वाद घालताना दिसत आहेत. त्यातच मराठा आरक्षणाचा विषय दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. त्यातच आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आरक्षणाची मर्यादा वाढवावी, अशी मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. 'आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा. आरक्षणाची मर्यादा 50 टक्क्यांवरून 75 टक्क्यांवर न्या, केंद्राने मर्यादा वाढवण्याचा निर्णय घेतल्यास आमचा पाठिंबा असेल' असे शरद पवारांनी म्हटले. आता यावर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी नुकतंच पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांना शरद पवारांनी आरक्षणाबद्दल केलेल्या मागणीबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी भाष्य केले. "मी त्यांच्या मागणीचे कौतुक करतो. पण आमचं म्हणणं काय आहे, हे तुम्ही समजून घ्यायला तयार नाहीत. आम्ही काय म्हणतो ते आधी समजून घ्या, उगाचच तुमचे घोडे दामटू नका", असा सल्ला मनोज जरांगे पाटील यांनी दिला. "शरद पवारांनी केलेल्या मागणीचे मी कौतुक करतो. मर्यादा वाढली तर मराठा समाज ओबीसीत येणार आहे. परंतु आमचे म्हणणे काय आहे, हे तुम्ही समजून घ्यायला तयार नाहीत. महायुती आणि महाविकासआघाडी या दोघांनीही राजकीय स्वार्थासाठी बोलू नका. तुम्ही अगोदर आमच्या भावना, दुःख समजून घ्या. गोरगरिबांचे म्हणणे समजून घ्या.



## मर्यादा वाढली तरच आरक्षण टिकणार

"आमचे म्हणणे आहे की मराठ्यांना तुम्ही 27 टक्के ओबीसी आरक्षणात आणि 50 टक्क्यांच्या आत आम्हाला घ्या. मग तुम्ही कितीही मर्यादा वाढवा. तुम्ही ते का म्हणत नाही? आधी तुम्ही मराठ्यांना ओबीसीत टाका. आम्ही हे सांगतो ते करा. तुमच्यावरही नाराजी पसरायला लागली आहे. तुमची केलेली मागणी योग्य आहे, मर्यादा वाढली तरच आरक्षण टिकणार आहे. अन्यथा ते टिकणार नाही. परंतु आधी आम्ही काय म्हणतो ते जाणून घ्या, तुमचे घोडे दामटू नका", असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले."निवडणूक जवळ आली की फुसके बार सोडून द्यायचे आणि म्हणायचे आम्ही मागणी केली होती, अशी मागणी आम्हाला नको. आधी मराठ्यांना 27 टक्के ओबीसी आणि 50 टक्क्यांच्या आत घ्या. लोकसंख्येच्या प्रमाणात मराठ्यांना ओबीसीत आरक्षण द्या आणि मर्यादा वाढवा", असेही मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

## भाजप संपवायचे नसेल, तर ते कधीच आचारसंहिता लावणार नाहीत

हे की देवेंद्र फडणवीस हे कधीही आचारसंहिता लागू देणार नाहीत. हे मी 100 टक्के सांगतो. देवेंद्र फडणवीस हे हुशार आहेत, त्यांना जर सत्तेतील अस्तित्व घालायचे नसेल, भाजप संपवायचे नसेल, तर ते कधीच आचारसंहिता लावणार नाहीत. त्यांना जर स्वतःला आणि पक्षाला संपवून घ्यायचे असेल, तर ते आचारसंहिता लावतील. मराठ्यांच्या मागण्याची अंमलबजावणी केल्याशिवाय ते निवडणूक घेणार नाहीत आणि मला ती खात्री आहे. मला याची पूर्णपणे खात्री आहे. यासाठी जर 10 ते 20 दिवस निवडणूक पुढे ढकलायची वेळ आली, तर ते ढकलतील", असे जरांगे पाटील यांनी म्हटले.

"पण जर त्यांनी तसे केले तर येणार काळ त्यांना नक्कीच धडा शिकवेल. जनता त्यांना असा धडा शिकवेल की ते परत राजकीय प्रवासात येणार नाही आणि हे आपले चॅलेंज आहे", असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले

# दसऱ्याच्या आदल्या दिवशी राज्यभरातील शिक्षकांचे आझाद मैदानावर होणार सीमोल्लंघन

## आझाद मैदान ते मंत्रालय मोर्चा व्दारे शिक्षक-पालक आक्रोश दाखवणार

25 सप्टेंबर 2024 रोजी राज्यभर शिक्षकांनी रजा टाकून आम्हाला विद्यार्थ्यांना शिकवू द्या चा नारा देत शासनाच्या चुकीच्या धोरणा विरोधात महाआक्रोश दाखवत आंदोलन केले. यात 2 ते 3 लाख लोकांनी सहभाग नोंदवलेला होता. मात्र शासनाने अद्याप देखील या आंदोलनाची योग्य ती दखल घेतलेली नसून शिक्षकांच्या मागण्या बाबत कोणताही सकारात्मक निर्णय शासनाने न घेतल्यामुळे राज्यभरातील शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष आहे . तसेच शासनाच्या काही चुकीच्या धोरणामुळे मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असल्यामुळे या धोरणा विरोधात पालक देखील मोठया प्रमाणावर या आंदोलनात सहभागी होण्याची शक्यता आहे. शिक्षक- पालकांचा हा असंतोष आता दसऱ्याच्या एक दिवस अगोदर म्हणजेच 11 ऑक्टोंबर रोजी आझाद मैदानात राज्यभरातील शिक्षकांचे आंदोलन होणार असून या प्रसंगी आझाद मैदान ते मंत्रालय मुंबई महामोर्चा काढून शासन धोरण विरोधातील संताप व्यक्त होणार असुन शासनाच्या चुकीच्या धोरणा विरोधात हे सिमाल्लोंघन ठरणार आहे. या आंदोलनात राज्यातील सर्व शिक्षक व पालकांनी सहभागी होण्याने आवाहन अटल शिक्षक संघटनेचे राज्यसचिव श्री अमोल जाधव यांनी केले आहे.



**शिक्षक- पालक यांच्यामध्ये इतका असंतोष का?**

जिल्हापरिषद, नगरपालिका, महानगर पालिका शाळांमध्ये शासन कोणतेही शिक्षकेतर कर्मचारी देत नसून कामांचा मात्र शिक्षकांवर भडिमार केला जात आहे. त्यामध्ये एका क्लार्क ला नाहीत एवढी क्लेरिकल कामे- त्यामध्ये शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक, माता पालक, सखी सावित्री, अशा 10-12 समित्या स्थापन करणे, त्यांच्या मीटिंग घेणे, त्याच्या प्रोसिडिंग बनवणे. त्याच बरोबर विविध नोंदीची ची 100 पेक्षा जास्त वेगवेगळी रजिस्टर/ फाईल यांच्या नियमित नोंदी ठेवणे, गावातील लोकांना त्यांच्या कास्ट व्हॅलिड होण्यासाठी, लाडकी बहिण सारखा योजनांसाठी शाळेकडून दाखले देणे शासनाचे विविध सप्ताह, दिवस साजरे करणे त्यासाठी गावातील लोकांना जमवून त्याचे फोटो काढून शासनास पाठवणे, कार्यक्रम बाबत च्या नियमित लिंक भरणे.एका कॉम्पुटर ऑपरेटर ला नाहीत एवढी ऑनलाइन ची कामे- सर्व विद्यार्थी, शिक्षक , शाळा यांची माहिती सरल पोर्टल वर ऑनलाइन भरणे, अशीच माहिती Udise पोर्टल वर भरणे, शिष्यवृत्ती सह इतर आर्थिक योजनासाठी प्रस्ताव करून सर्व माहिती ऑनलाईन करणे, त्यांचे पैसे परत ऑनलाईन माहिती बनवून बँकेत पैसे जमा करणे, त्याच्या सर्व नोंदी ठेवणे.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या विविध प्रश्नपत्रिका झेरॉक्स काढून महिन्याला परीक्षा घेणे, त्याची ऑनलाइन माहिती भरणे. ज्यांचे आधार नाहीत त्यांचे आधार काढून त्याची माहिती ऑनलाइन करणे. शासनाकडून येणाऱ्या नियमित लिंक तत्काळ भरणे. मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त चार्ज- जि.प. च्या 90 % पेक्षा अधिक शाळांना स्वतंत्र मुख्याध्यापक पद नसताना देखील चार्ज सांभाळून अतिरिक्त कामे करणे. त्यामधे शालेय व्यवस्थापन समिती सह इतर 10- 12 समित्यांच्या सभा घेउन त्यांच्या मीटिंग आयोजित करणे त्यांची सर्व प्रोसिंडिंग बनवणे, मीटिंग आयोजीत करून त्याची माहिती ऑनलाईन करणे. Blo म्हणून अतिरिक्त काम -मतदार याद्या बनवणे, दुरुस्त करणे. प्रौढ अशिक्षितांचे वेगवेगळे सर्वे करणे त्यांच्या ऑनलाइन नोंदी करणे, त्यांना शिकवण्यासाठी स्वयंसेवक नेमणे, अशिक्षितांच्या परीक्षा घेणे, त्याचे पेपर तपासून मार्क तयार करणे, ऑनलाइन भरणे, त्यांना प्रमाणपत्र देणे. अशी असंख्य कामे शिक्षकांवर लादली गेलेली असल्याने मुलांना शिकवण्यासाठी हवा तो वेळ देणे शक्य होत नाही. तसेच ऑनलाईन, कलेरिकल मुख्याध्यापक कामासाठी कोणतेही अतिरिक्त कर्मचारी व त्यासाठी आवश्यक कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल न देता हि सर्व कामे शिक्षकांच्या मोबाईल वरुन करावी लागतात. अनेक वेळा शाळेतून अशी तत्काळ माहिती पाठवत असताना गावातील लोकांमध्ये शिक्षक मोबाईल वापरत असल्याचा संभ्रम निर्माण होउन त्यातून शिक्षकांची बदनामी देखील होते. हे सर्व थांबवा आणि आम्हाला मुलांना शिकवू दया चा नारा देत 11 ऑक्टबर रोजी आझाद मैदान येथे महा आंदोलन होणार आहे. तसेच शासनाच्या चुकीच्या धोरणाने शिक्षकांना वेठबिगार बनवले असून शिक्षकांना शिकवण्या पेक्षा इतर कामे जास्त लावल्यामुळे त्याचा परिणाम गरिबांच्या सरकारी शाळा बंद पडन्यावर होत असून आमदार, खासदार, मंत्री यांच्या खाजगी शाळांना यामुळे सुगीचे दिवस येत आहेत. हे लक्षांत आल्याने पालक देखील मोठया प्रमाणावर या आंदोलनात सहभागी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

> " अगोदर शिक्षकांवर प्रचंड कामाचे ओझे असताना 15 मार्च 2024 च्या शासन निर्णयाद्वारे 20 पर्यंत केवळ नियमित 1 पद मंजूर करून 60 पुढील पटासाठी पुढील शिक्षक पद मंजूर होण्यासाठी 16 अतिरिक्त पदांची अट घातली आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावर शिक्षक पदे कमी होणार असून पालकांचा शाळेवरील विश्वास उडून मराठी शाळा मोठया प्रमाणावर बंद पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे तत्काळ हा शासन निर्णय मागे घेण्यात यावा."
> अझहर पठाण
> कोषाध्यक्ष
> अटल शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य

> "चुकीच्या शासन धोरणा विरोधात शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष असून सरकारने तत्काळ सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेउन योग्य तो मार्ग काढून शिक्षकांवर आलेली आंदोलनाची वेळ टाळावी तसेच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांचा असंतोष सरकारने दुर करावा"
> - जयंत आमटे संस्थापक तथा राज्याध्यक्ष अटल शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य

**शिक्षकांच्या मागण्या काय?**

१५ मार्च २०२४ चा संचमान्यतेचा आरटीईविरोधी शासन निर्णय रद्द करावा, वीस पटाच्या शाळांबाबतचा ५ सप्टेंबर २०२४ रोजीचा शासन निर्णय रद्द करावा. जिल्हा परिषदेच्या शाळांबाबतीत अवलंबलेले कंत्राटीकरणाचे धोरण विनाविलंब रद्द करावे, १ नोव्हेंबर २००५ व तद्नंतर नियुक्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, शैक्षणिक-अशैक्षणिक कामांच्या शासन निर्णयाबाबत शिक्षक संघटनांसोबत चर्चा करून दुरुस्ती करावी, जिल्हा परिषद शिक्षक आंतरजिल्हा बदली 7 वा टप्पा तत्काळ राबवावा, 18 जुन 2024 च्या शासन निर्णय प्रमाणे जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रिया तत्काळ सुरू करावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये राबवले जाणारे अनेकविध उपक्रम, निरनिराळे सप्ताह, अभियाने, बहि:शाल संस्थांच्या परीक्षा, ऑनलाइन/ऑफलाइन माहितीचे अहवाल, माहितीची वारंवारिता इत्यादी कामे तावडतोब थांबवावीत, केंद्र प्रमुख अधिसूचना अंतिम करून रिक्त पदे तत्काळ भरण्यात यावीत. शिक्षण हक्क कायद्यातील कलम २७ मध्ये नमूद केल्याशिवाय बीएलओ, तसेच अन्य कोणतीही अशैक्षणिक कामे देऊ नयेत. प्रत्येक केंद्र स्तरावर डेटा एंट्री ऑपरेटर नेमावा, विद्यार्थ्यांना त्यांच्या मापाचे गणवेश विनाविलंब मिळावेत. पाचवी ते आठवीतल्या विद्यार्थ्यांना फूल पँट द्यावी. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात राबविलेली गणवेश योजना रद्द करून जुन्याच पद्धतीने गणवेश योजना कार्यान्वित करावी, पाठ्यपुस्तकांना कोरी पाने न देता स्वतंत्र स्वाध्याय पुस्तिका, वह्या द्याव्यात, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कार्यरत प्राथमिक शिक्षकांना मुख्यालयी निवास करून राहण्याची अट रद्द करावी, शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र यंत्रणेकडे सोपवावी, विद्यार्थी आधार कार्ड संबधाने असणाऱ्या वास्तव अडचणी लक्षात घेऊन, आधार कार्ड आधारित शिक्षक पद निर्धारणाचे धोरण रद्द करावे, सातव्या वेतन आयोगातील पदवीधर शिक्षकांच्या व वरिष्ठ वेतनश्रेणीधारक शिक्षकांच्या वेतनत्रुटीचा विषय मार्गी लावावा, राज्यातील शिक्षकांना १०, २०, ३० सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करावी, कॅशलेस आरोग्य योजना लागू करावी, सर्व शिक्षकांना निवडश्रेणी द्यावी. पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करावी, नगरपालिका, महानगरपालिका गट क, ड मधील शिक्षकांच्या वेतनाचे शंभर टक्के अनुदान शासनाने द्यावे. या शिक्षकांचे वेतन शालार्थ प्रणालीच्या ई-कुबेरअंतर्गत व्हावे, अशा शिक्षकांच्या मागण्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com